आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१६ जून २०२५ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी अभिनव उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचं स्वागत

- धरती आबा लोकसहभाग मोहिमेला पालघरमधून सुरुवात

- गेल्या साडे पाच महिन्यात देशात ९१ वाघांचा मृत्यू, राज्यात सर्वाधिक २६ मृृत्यू

**आणि**

- महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धा ३० सप्टेंबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत भारत आणि श्रीलंकेत होणार

**<><><><><>**

राज्यात आजपासून नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाली. राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाच्या वतीने अनेक शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचं पहिल्या दिवशी अनोख्या पद्धतीनं स्वागत करण्याच्या उद्देशाने अनेक शाळांनी विविध उपक्रम राबवले. ठिकठिकाणी शाळांच्या इमारती पताका आणि चित्रांनी सजवल्या होत्या. मुलांना खाऊ, फुलं आणि शालोपयोगी साहित्याचं वाटप करण्यात आलं. कुठे ढोलताशांच्या गजरात तर कुठे बैलगाडीतून मिरवणुकीनं तर कुठे औक्षण करुन आणि चिमुकल्यांच्या पावलांचे ठसे घेऊन त्यांचं स्वागत करण्यात आलं. अनेक ठिकाणी मंत्री, लोकप्रतिनिधी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शाळांमधे विद्यार्थ्यांचं स्वागत केलं. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पालघर जिल्ह्याच्या दौऱ्यात, दुर्वेस इथल्या जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांचं स्वागत केलं. सातारा जिल्ह्यात कोडोली इथं जिल्हा परिषदेच्या शाळेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विद्यार्थ्यांचं स्वागत केलं. तर उपमुख्यमंत्री अजित पवार पुणे जिल्ह्यात दौंड इथं जिल्हापरिषद शाळेत विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी उपस्थित होते. या नेत्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. नाशिक जिल्ह्यात बागलाण तालुक्यातल्या तुंगणदिगर गावात बैलगाडीतून विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी विद्यार्थ्यांचं स्वागत करुन त्यांच्यासमवेत*

*भोजनाचा आस्वाद घेतला. या शाळेत आदिवासी भागातून ७४ विद्यार्थी येतात. सांगलीत पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी जिल्हापरिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांचं स्वागत केलं.*

पेसा क्षेत्रातल्या भर्तीचं प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. मात्र, विद्यार्थ्यांचं शैक्षणिक हित लक्षात घेऊन बाह्यस्रेतांमार्फत शिक्षक भरती केली जाणार असल्याची माहिती आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक ऊईके यांनी दिली. नाशिक जिल्ह्यात मुंढेगांव इथं विद्यार्थ्यांच्या शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते.

*धाराशिव जिल्ह्यात तुळजापूर नगरपरिषद प्राथमिक शाळेत नवीन विद्यार्थ्यांचं फेटे बांधून, फुलं आणि पेढे देऊन तसंच त्यांच्या चिमुकल्या पावलांचे ठसे घेऊन स्वागत करण्यात आलं. लातूर जिल्ह्यात शाळेच्या पहिल्या दिवशीच विद्यार्थ्यांचं उत्साहात स्वागत करताना पहिलीतल्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकं, गणवेश, बूट आणि मोजे वितरित करण्यात आले. छत्रपती संभाजीनगर इथं पहिल्यांदा शाळेत येणाऱ्या चिमुकल्यांचं औक्षण करून तसंच फुलांची उधळण करून स्वागत केलं. )*

**<><><><><>**

लातूर जिल्ह्यातल्या खंडापूर गावात जिल्हा परिषदेच्या शाळेत गेले ६ महिने गणित आणि विज्ञान विषयाचे शिक्षक नसल्याच्या निषेधार्थ आज शाळेच्या पहिल्याच दिवशी ग्रामस्थांनी शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर घोषणा देत निदर्शनं केली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियानाअंतर्गत धरती आबा लोकसहभाग मोहिमेची सुरुवात आज पालघर जिल्ह्यात मनोर इथं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या हस्ते झाली.

आदिवासींच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी हे धरती आबा अभियान एक चांगली संधी असून पालघर जिल्ह्यातल्या ६५४ गावांमध्ये ते राबवलं जाणार आहे. शासनाच्या १७ विविध विभागांच्या २५ योजना यामध्ये समाविष्ट केल्या आहेत. ज्या ठिकाणी ५० टक्क्यांपेक्षा पेक्षा जास्त आदिवासी लोकवस्ती आहे तिथं ही योजना राबवली जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. धरती आबा अभियानामुळे पालघर जिल्ह्यात आणि राज्यातल्या अनेक गावांमध्ये परिवर्तन घडून येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ते म्हणाले…

**होल्ड - बाईट - मुख्यमंत्री**

येत्या १५ ऑगस्टपर्यंत वनपट्टे निकाली काढण्याचे आदेशही त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.

**<><><><><>**

राज्यातल्या प्रत्येक गरजू रुग्णाला वेळेवर रक्त मिळावं, रक्ताचा तुटवडा निर्माण होऊ नये आणि रक्त वायाही जाऊ नये यासाठी 'नो शॉर्टेज, नो वेस्टेज' हे धोरण अंमलात आणावं, असे निर्देश आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज पुण्यात दिले. आरोग्य भवनात झालेल्या राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. उन्हाळ्यात आणि सणासुदीच्या काळात रक्तदान शिबिरांची संख्या घटल्यामुळे रक्ताचा तुटवडा जाणवतो. ही परिस्थिती लक्षात घेऊन राज्यातल्या सर्व गरजू रुग्णांना वेळेत रक्त उपलब्ध होण्यासाठी नवीन धोरण उपयोगाचं ठरणार असल्याचं आबिटकर यांनी सांगितलं.

<><><><><>

गेल्या साडेपाच महिन्यात देशात ९१ वाघांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी राष्ट्रीय व्याघ्र संरक्षण प्राधिकरणाने दिली आहे. त्यातले २६ वाघ राज्यात मृत्यूमुखी पडले आहेत. शिकार, मानव-वन्यजीव संघर्ष, रेल्वे अपघात, वाघांचे प्रादेशिक संघर्ष आणि नैसर्गिक कारणांमुळे हे मृत्यू झाले आहेत.

मध्य प्रदेशात २४, केरळमध्ये नऊ, आसाममध्ये आठ, तर उत्तराखंडमध्ये सात वाघ मरण पावले आहेत. गेल्यावर्षी देशात एकूण १२६ वाघांचा मृत्यू झाला होता.

<><><><><>

यंदाची महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धा भारत आणि श्रीलंकेत येत्या ३० सप्टेंबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत होणार आहे. भारत, श्रीलंका, ऑस्ट्रेलिया, दक्षिण अफ्रिका, न्यूझीलंड, बांगला देश, आणि पाकिस्तान हे संघ या स्पर्धेत सहभागी होतील. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं आज या स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर केलं. ३० सप्टेंबरला भारत आणि श्रीलंका यांच्यातल्या सामन्यानं महिला विश्वचषकाला सुरुवात होईल. या स्पर्धेतला उपांत्य फेरीचा पहिला सामना २९ ऑक्टोबरला कोलंबोमध्ये, तर दुसरा उपांत्य सामना ३० ऑक्टोबरला बंगळुरुमध्ये

होणार आहे. पारंपरिक प्रतिस्पर्धी भारत आणि पाकिस्तान यांच्यात साखळी स्पर्धेतला सामना ५ ऑक्टोबरला कोलंबोमध्ये होणार आहे. या स्पर्धेत पाकिस्तान आपले सर्व सामने श्रीलंकेमध्ये खेळणार आहे. अंतिम सामना २ नोव्हेंबरला बंगळुरुच्या चिन्नास्वामी मैदानावर होईल. पाकिस्तान अंतिम सामन्यात पोहचला, तर हा सामना कोलंबोत होईल.

**<><><><><>**

सिंधुदुर्गात गेले तीन दिवस सतत कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे मालवण तालुक्यातल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या चबुतऱ्याचा भराव किंचीत खचला आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी आज या परिसराची पाहणी केली. यावेळी पुतळा आणि चबुतरा सुस्थितीत असल्याचं अभियंत्यांनी सांगितलं. तसंच  किचिंतसा खचलेल्या चबुतऱ्याच्या डागडुजीचं काम सुरू झाल्याचं बांधकाम विभागानं सांगितलं.

**<><><><><>**

**कोल्हापूर** जिल्ह्यात पावसानं पुन्हा जोर धरलाय आहे. धरणक्षेत्रातही जोरदार पाऊस पडत असल्यानं पाटबंधारे विभागानं  राधानगरी धरणातून विसर्ग वाढवला आहे. तसंच 'भोगावती 'पंचगंगा' काठावरच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. राधानगरी, दूधगंगा, कासारी घटप्रभा आदी धरणातून विसर्ग सुरू  केला आहे. संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळित झालं आहे.

**सातारा** जिल्ह्यात कोयना धरण पाणलोट क्षेत्रासह पाटण तालुक्यात मुसळधार पाऊस कोसळत आहे. कोयना जलाशयात प्रती सेकंद १२ हजार ५३८ क्युसेक पाण्याची आवक होत आहे.

**कल्याण** शहराच्या पश्चिम भागात आज सकाळी एका चाळीचा स्लॅब कोसळला. या घटनेत कोणतीही जिवित हानी झालेली नाही.

**नवी मुंबईतल्या** वाशीमध्ये व्यापारी संकुलाची संरक्षक भिंत आज अतिवृष्टीमुळे दुपारी कोसळली. या अपघातात जिवितहानी झाली नसली वाहनांचं नुकसान झालं.

<><><><><>

इराण आणि इस्राइलमधल्या तणावामुळं काही दिवसांपासून घसरत असलेले देशातले शेअर बाजार आज वधारले. त्यामुळं सेन्सेक्स ६७८ अंकांनी वधारून ८१ हजार ७९६ अंकांवर बंद झाला. निफ्टी २२८ अंकांची वाढ नोंदवून २४ हजार ९४६ अंकांवर स्थिरावला. माहिती तंत्रज्ञान, बांधकाम, तेल आणि नैसर्गिक वायू तसंच धातू क्षेत्रातल्या कंपन्यांच्या समभागांमध्ये आज जास्त तेजी दिसून आली.

<><><><><>

२०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेची आणि पहिल्यांदाच होणाऱ्या जातनिहाय जनगणनेची अधिसूचना आज राजपत्रात प्रसिद्ध झाली. ही १६वी राष्ट्रीय जनगणना असून भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची आठवी जनगणना आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी विशेषत किनारपट्टी भागात सोसाट्याच्या वाऱ्यासह अतिवृष्टीची शक्यता, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस, आणि काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता  हवामान विभागानं वर्तवली आहे. या काळात विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह जोरदार पावसाची शक्यता आहे. पुढील २४ तासांसाठी रत्नागिरी, रायगड या जिल्हयाला रेड अलर्ट तर पालघर, ठाणे, पुणे घाट परिसर, सातारा घाट, कोल्हापूर घाट, आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट हवामान विभागानं दिला आहे.

//<><><><><>//